थिएटरमधे वर्षात व्यावसायिक नाटकांचे कमीत कमी सहाशे प्रयोग आपण धरले तर निर्मात्यांकडून केवळ एका थिएटरच्या प्रयोगांपासून साठ हजार रुपये या निधीसाठी मिळू शकतात. आपण विचार करा. निर्मात्यांबरोबरच रंगमंच कामगारांविषयी अपार सहानुभूती असलेले कलावंतही मागे रहाणार नाहीत याची मला खात्री आहे.

रसिकहो, संगीत रंगभूमीचं चित्रही व्यावसायिक रंगभूमीपेक्षा फारसं वेगळं नाही. रंगभूमीचं सुरुवातीचं अर्धशतक हे संगीत रंगभूमीचं होतं. किर्लोस्कर, देवल, खाडिलकर, गडकरी हे दिग्गज नाटककार, बालगंधर्व, मा. दिनानाथ, केशवराव भोसले, बापुराव पेंढारकर हे असामान्य गायक कलावंत, भास्करबुवा बखले, गोविंदराव टेंबे, वझेबुवा, यांच्यासारखे प्रतिभावान संगीतकार यांनी रंगभूमीवर अधिराज्य गाजवलं. पुढे रंगभूमीवर झालेला संगीताचा अतिरेक, जीवनशैलीत आणि अभिरुचीत झालेला बदल आणि अशा अनेक कारणांनी क्षीण झालेलं संगीत नाटक याविषयी इतकं लिहिलं, बोललं गेलं आहे की त्याची उजळणी मी इथं करीत नाही. या क्षीण संगीत रंगभूमीला नवजीवन द्यायचा यशस्वी प्रयत्न केला तो नाटककार विद्याधर गोखले यांनी. जितेंद्र अभिषेकी, वसंत देसाई, राम मराठे, छोटा गंधर्व या संगीतकारांचं आणि ललित कला दर्श, साहित्य संघ, मराठी रंगभूमी, भरत नाट्य मंदिर अशा संस्थांचं आणि राज्य नाट्य स्पर्धेचं योगदान आपल्याला विसरुन चालणार नाही. परंतु विद्याधर गोखल्यांनंतर आणि छोटा गंधर्व, वसंतराव देशपांडे, राम मराठे यांच्या निधनानंतर संगीत रंगभूमी पोरकी झाल्यासारखी वाटते.

आपली संगीत रंगभूमीची उज्ज्वल परंपरा नष्ट होणार की काय या चिंतेनं अनेक रसिक व्यथित झाले आहेत. आज सौभद्र, मानापमान यासारखी नाटकं येत नाहीत ही त्यांची खंत आहे. रसिकहो, परंपरा जोपासणं आणि टिकवणं म्हणजे काय? २००५ साली, बदललेली जीवनशैली, बदललेलं समाजजीवन, बदलती अभिरुची या परिस्थितीत आजच्या लेखकांनी सौभद्र, मानापमान सारखी नाटकं लिहिणं आणि ती रंगमंचावर आणणं म्हणजे परंपरा जोपासणं नव्हे. ही अपेक्षा सर्वस्वी अव्यवहार्य आहे. अशी नाटकं कुणी लिहिली तर त्याला आडकाठी नाही. परंतु कलेच्या क्षेत्रात परिवर्तन अटळ असतं, संकल्पना सतत बदलत असतात. कला म्हणजे साचलेल्या पाण्याचं डबकं नाही. तिचा प्रवाह वेगवेगळी वळणं घेत असतो. संगीत नाटकाच्या रचनेत, शैलीत आणि संगीताच्या संकल्पनांत होणारे